जिल्हा परिषद,यवतमाळ
कार्यालय,शिक्षण विभाग,प्राथमिक
दुसरा माळा, प्रशासकीय इमारतआर्णी रोड ,, यवतमाळ
E-mail – eopriytl@gmail.com दुरध्वनी क्र. 07232244295-

यजिप/शिविप्रा/ कावि/१-आस्था/ १४४२ /२०२४ यवतमाळ दिनांक:- ५-०३-२०२४

शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ मुलाखती शिवाय पदनिवडीचा विकल्प दिलेल्या संस्थांमध्ये पवित्र प्रणाली अंतर्गत शिक्षक पदभरती निवड यादीतील उमेदवारांच्या पदस्थापने बाबत व पुढील आवश्यक कार्यवाही बाबत.

# जाहीर सुचना

उपरोक्त विषयान्वये जिल्हा परिषद यवतमाळ द्वारा शिक्षक पदभरती करीता पवित्र प्रणालीवर दिलेल्या मराठी माध्यम – ३६८ उर्दु माध्यम – २८ पदांची जाहीरात देण्यात आलेली होती.सदर जाहीरातीनुसार शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ यामध्ये प्राप्त गुणांच्या आधारे पवित्र प्रणालीवर एकूण मराठी माध्यम २६९ उर्दु माध्यम–१३ उमेदवारांची गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात आलेली होती .सदर यादीनुसार मुळ दस्तऐवजाची तपासणी करीता **जिल्हा परिषद सभागृह, जि. प. यवतमाळ** येथे उपस्थित राहण्याबाबत उमेदवारांना खालील प्रमाणे वेळापत्रक देण्यात आलेले होते.

| अ.क्र. | पवित्र प्रणालीवर प्रसिध्द यादीतील उमेदवाराचा अ.क्र. | मुळ कागदपत्रे तपासणीकरीता उपस्थित राहण्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मराठी माध्यम **१ ते ९४** | ०२/०३/२०२४ | |
| २ | मराठी माध्यम **९५ ते १८८** | ०३/०३/२०२४ | |
| ३ | मराठी माध्यम **१८९ ते २६९** व उर्दु माध्यम **१ ते १३** | ०४/०३/२०२४ | |

वरील प्रमाणे पवित्र पोर्टलनुसार मराठी माध्यम २६९ उर्दु माध्यम – १३ उमेदवारांची यादी प्राप्त झाल्यानुसार सबंधित उमेदवारांना दस्तऐवजाची तपासणी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे पाच पथक करून मुळ दस्तऐवजाची तपासणी करण्यात आलेली आहे. सदर उमेदवारांनाने समुपदेशनाने पदस्थापना देण्याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ यांनी दिनांक ०६/०३/२०२४ रोंजी समुपदेशन ठेवण्याचे निर्देश दिले आहे. तरी सदर समुपदेशनाला दुपारी २.०० वा. मुळ कागपत्रासह **जिल्हा परिषद सभागृह, जि. प. यवतमाळ** येथे न चुकता उपस्थित राहावे.

५/०३/२४

(प्रकाश मिश्रा)
**शिक्षणाधिकारी(प्राथमिक)**
**जिल्हा परिषद यवतमाळ**

**प्रतिलिपी :-**

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा) जिल्हा परिषद, यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. शाखा अभियंता, बांधकाम विभाग, प्रशासकिय इमारत जि.प. यवतमाळ आपणास सुचित करण्यात येते की, दिनांक ०६/०३/२०२४ ला होणाऱ्या समुपदेशनाकरीता जि.प. सभागृह उघडून स्वच्छ करून उपलब्ध करून दयावे.